# लेखकाचे मनोगत

भारताबाहेर मी जेव्हा कामानिमित्त जाऊ लागलो तेव्हा वांशिक भेदाभेद काय असतो नि लोक तो कसा हवा तेव्हा वापरतात याचे छोटे-मोठे अनुभव घेऊ लागलो. वंशाभिमानी लोक भारतातही कमी नाहीत. वांशिक शुद्धतेच्या नावाखाली किती लोकांवर अन्याय झाला, किती संसार-कुटुंबे दुभंगली, किती जणांचं बौद्धिक-सांस्कृतिक-सामाजिक खच्चीकरण करण्यात आलं नि किती वांशिक लढाया लढल्या गेल्या; या साऱ्या क्लेषकारक इतिहासाची उजळणी इथे करण्याचं कारण नाही. पण 'वंशाभिमाना'मुळे जेव्हा तुम्हाला एखादी संधी – एखाद्या कार्याचं श्रेय अथवा एखादा गौरव नाकारला जातो तेव्हा येणारी हतबलतेची कसनुशी भावना मी छोट्या-मोठ्या प्रसंगांमधून पाहिली, अनुभवली नि निश्चय केला की जगभर छळणाऱ्या या 'विकृती'ला लेखनातूनही सामोरं जायचं.

भारतीय इतिहासात 'वांशिक' गोंधळाचे बरे-वाईट बरेच प्रकार दिसतात. अमुक-तमुक मुलगा हा या वंशातला-खानदानातला नि म्हणून तो 'श्रेष्ठतम'च असणार अशी भाबडी भावना आमच्या मनामध्ये 'सिस्टिमिकली' रुजविली जाते नि मग आम्ही त्या मुलासमोर आणि त्याच्या भावी पिढ्यांसमोर मोठ्या श्रद्धेने नतमस्तक होत जातो. 'बुद्धिमत्ते'चा किंवा 'धैर्या'चा अथवा 'उद्योजकते'चा मक्ता एक-दोन वंशियांकडे आम्ही सहजपणे बहाल करतो नि स्वतःच्याच विविध पराक्रमांना किंवा पराक्रमी शक्यतांना बंधने घालतो. अर्थात हे असे प्रकार युरोपातही अनेक शतके चालले नि आजही कमी-अधिक प्रमाणात चालताहेत. या साऱ्या दुःखद पार्श्वभूमीवर सुखद असे एक 'वैश्विक' चित्र हल्ली साकारू लागले आहे. उद्योग-शिक्षण-संशोधन-क्रीडा-कला वगैरे बऱ्याच क्षेत्रांमध्ये वांशिक भेदाभेद बाजूला ठेवून देशोदेशीचे युवक एकत्र येताहेत, काम करताहेत नि एका सुदृढ जगाची आपल्यापरीने निर्मिती करण्याचा प्रयत्नही करताहेत. या प्रयत्नांमध्ये खीळ घालण्याचा प्रयत्न वंशाभिमानी आजही करताना दिसताहेत.

युरोपीय वंश-उपवंश बाजूला ठेवून युरोपियनांनी 'अमेरिका' नावाचे बलाढ्य राष्ट्र उभे केले. विज्ञानाचा आधार घेत नि चमकदार उद्योजकता राबवीत अमेरिकनांनी प्रचंड संपत्तीची निर्मिती केली. 'महासत्ता' गणला जाणारा हा देश आज 'वांशिक' तरंगांना फारसे महत्त्व न देता एक 'आर्थिक साम्राज्य' जगभर उभं करतोय. या उभारणीत चपखलपणे भिन्न वंशीय लोक आपापली भूमिका बजावताहेत. जणू काही 'आर्थिक समृद्धी'लाच प्रचंड महत्त्व देणारा एक नवा वंश साकारतोय. या नव्या वंशातले बरेच सहभागी फक्त (आणि फक्त) 'आर्थिक भाषा'च बोलताहेत. 'बिलीओनेअर', 'प्रायव्हेट इक्विटी', 'मार्केट कॅप', 'ॲक्विझिशन्स', 'ब्रॅण्ड इक्विटी' आणि 'डेरिव्हेटिव्हज्'ची एक आक्रमक शब्दावली आता तयार झाली आहे. टोकियोचा 'इक्विटी फंड'वाला जपानी (मंगोलियन) आता 'मिड कॅप' कंपनीच्या भारतीय (आर्यन) मालकाशी अमेरिकन (ब्रिटिश) दलालाच्या मदतीने बोलतो आहे नि नायजेरियन (आफ्रिकन) खाण विकत घेण्याच्या 'फॉर्म्युला'बद्दल ही सारी चर्चा होते आहे. हे सारे आर्थिक परिमाणांवर छान-छान वाटते. गोची होते आहे ती 'मानव' नावाच्या एका मूलगामी वंशाची नि त्याला ताकद देणाऱ्या अवतीभवतीच्या पर्यावरणाची.

घनघोर गंमत (?) म्हणजे या नव्या 'आर्थिक वंशा'चे अभिमानी आपली समृद्धी वाढविण्याच्या नवनव्या युद्धांमध्ये आता खोलवर गुंतत चाललेत. यातील काहीजण हतबलांची - दुर्बलांची - निरागसांची समृद्धी ओरबाडून घेताहेत. ओरबाडण्याचे प्रकार वरवर 'साळसूद' दिसणाऱ्या नियमांनी घडताहेत. हा साळसूदपणा निरागसांच्या समजण्यापलीकडचा आहे. बरेच 'सर्वसंमत' वा 'परस्परसंमत' भ्रष्टाचारी मार्ग 'बाजारी अर्थव्यवस्थे'च्या रचनेत चपखलपणे बसवीत हे 'नवआर्थिकवादा'चे 'आर्थिक वंशीय' युद्धखोर साऱ्या विश्वालाच एका नव्या वंशवादाच्या विनाशकारी गर्तेत लोटताहेत. येत्या काही दशकांमध्ये दोनच 'आर्थिक वंशीय' गट शिल्लक राहतील, लढत राहतील – 'खूप खूप आहे रे' नि 'काहीच कसं नाही रे'!

प्रचंड समृद्धी गाठीशी असतानाही अमेरिकेतल्या, जपानमधल्या नि काही कोरियन कंपन्यांमधल्या उच्चपदस्थांनी भरपूर भ्रष्टाचार करीत आपल्या कंपन्या बुडविल्या. असा भ्रष्टाचार करताना 'वांशिक भेदां'चा आधार घेतला गेला नि काही वेळा 'वांशिक भेद' बाजूलाही ठेवले गेले! (महाभारताचे महायुद्धही असेच घडले. पराक्रमी भीष्माने कुरुवंशाचा आंधळा वा असमंजस अभिमान ठेवला नसता नि न्यायाची बाजू घेतली असतील तर हे युद्ध टळलेही असते.) 'वंश' ही प्रस्तुत कादंबरी समांतरपणे 'वंशाभिमान' आणि 'आर्थिक भ्रष्टाचारा'चा वेध घेत बोचरे सत्य वाचकांसमोर मांडीत जाते. मराठी वाचकाने

'कार्पोरेट' जगतातील साठमाऱ्या मुळातूनच समजून घ्याव्यात, हा एक महत्त्वाचा उद्देश या कादंबरी लेखनामागे आहे.

संपूर्ण कादंबरी अमेरिकेत घडते. यास्तव कादंबरीतील घटना - पात्रे - भाषा - संस्कृती नि अन्य शक्यतांना 'अमेरिकी' संदर्भ आहेत. समृद्ध अमेरिका, गर्विष्ठ अमेरिका, गोंधळलेली अमेरिका, त्रस्त अमेरिका आणि अजूनही जगाचे केंद्रबिंदू राहिलेली अमेरिका कादंबरीला घडवीत जाते. अमेरिकन मापदंडांची तुलना म्हणूनच वाचकाने भारतीय मापदंडांशी न करता कादंबरीचे वाचन करावे ही लेखकाची एक माफक अपेक्षा आहे. कादंबरीतील घटना व पात्रांच्या तपशिलात 'तांत्रिक' चुका वा दोष राहू शकतात. पण कादंबरीचा गाभा हा विशिष्ट हेतूंवर आधारित असल्यने या तांत्रिक चुका 'मुख्य चर्चेचा विषय' ठरता कामा नये. (अन्यथा आम्ही मराठी वाचक पुन्हा भाषेच्या वा मांडणीच्या खोलीत शिरत पुन्हा कुठला 'वंशाभिमान' जपू, याचा काही भरवसा नाही!)

या कादंबरीतले आर्थिक-उद्योजकीय-वांशिक नि सांस्कृतिक साठमारीचे प्रकार जगाच्या पाठीवर कुठेही होऊ शकतात - होतात - होत आलेत. मुद्दा आहे तो आमच्या भाबडेपणाचा. माझ्या मते प्रत्येक कादंबरीकार एक विशिष्ट भूमिका घेत आपले लेखन करीत असतो. मराठी मनाचा 'सोज्ज्वळ' भाबडेपणा मी बघत आलोय. येऊ घातलेल्या कठीण जागतिक गदारोळाला तोंड देण्यासाठी मराठी माणसाला अधिक चलाख, अधिक सतर्क, अधिक मुत्सद्दी नि अधिक आक्रमक व्हावं लागेल. अर्थात, हे असं प्रत्येक भिडस्त माणसाला करावंच लागेल. 'वंश'ची मांडणी करण्यामागचा लेखक म्हणून माझा हा प्रमुख दृष्टिकोन आहे.

'वंशाभिमान' तुलनात्मकरीत्या पुसट झाला असला तरी तो आपले 'हैवानी' रूप अधून-मधून दाखवितोच. उत्तम अशा अरबी वंशाचा वा जनुकांचा घोडा भलेही एखाद्या अश्वप्रेमीला आवडणारा असला तरी असे वंशीय भेदाभेद 'जनुकीय विज्ञाना'ची ढाल पुढे करीत आम्ही 'मानव वंशा'ला लावणार असू तर वसुंधरेचे भवितव्य धूसरच असेल. कट्टरपंथीय म्हणत राहतातच की 'वांशिक शुद्धता' जपायलाच हवी; किंवा प्रत्येकाला आपापल्या वंशाचा अभिमान असायलाच हवा. पण असे अभिमानी असणारे किती 'वंशाचे दिवे' जगाच्या भल्यासाठी 'प्रकाशमान' ठरलेत, हा प्रश्न या कट्टरपंथीयांना विचारला की त्यांची पळता भुई थोडी होते!

'वंश' लिहिण्यासाठी, तिच्या प्रकाशनासाठी खूपजणांचे सहाय्य कामी आले. माझे मित्र व स्नेही असणारे श्री. प्रवीण सोमण, श्री. श्रीराम दांडेकर, श्री. अरविंद तावडे, सौ. नीलांबरी कुलकर्णी, श्री. वसंत दाते यांचा विशेष उल्लेख केलाच पाहिजे. कादंबरीस 'प्रस्तावना' लिहिणारे ज्येष्ठ उद्योगपती

श्री. सुभाष दांडेकर यांचा खूप आभारी आहे. कादंबरीची उत्तम निर्मिती करणारे श्री. राजेंद्र व सौ. नीलिमा कुलकर्णी या 'प्रकाशक' दांपत्याचे आणि माझ्या घरच्यांचेच आभार कसे मानू? 'एका मारवाड्याची गोष्ट' या माझ्या पहिल्या कादंबरीस वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला नि म्हणून 'वंश' लिहू शकलो. वाचकांच्या या प्रेमळ ऋणात मला सदैव राहायचे आहे!

**– डॉ. गिरीश प. जाखोटिया**